RNI No. MAHBIL /2009/35574

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ११, अंक १८] शनिवार, ऑगस्ट २३, २०२५/भाद्रपद १, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ४५

प्राधिकृत प्रकाशन

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ कोकण विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियमान्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

जिल्हाधिकारी, पालघर यांजकडून

अधिसूचना

महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२.

क्रमांक न. प्रशासन/क-१/टे-१/कावि-५५१/२०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्राच्या राज्य शासनाने २० डिसेंबर २०१२ रोजी केलेला महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ अधिनियमित केला होता;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, १९६२ (१९६२ चा महा.२७) च्या कलम ४ च्या खंड (अ) मधील उपखंड (दोन) व कलम ६- ब च्या खंड (अ) मधील उपखंड (दोन) नुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम (१९६५ चा ३) या अन्वये या घटीत केलेल्या तलासरी नगरपंचायतीच्या, नगरपंचायत क्षेत्राच्या बाबतीत दि. १ एप्रिल २०२५ पासून जमिनीचे किंवा इमारतीचे भांडवली मूल्य मालमत्ता कराच्या आकारणीच्या मूलाधार म्हणून स्वीकारलेल्या, निवासी व निवासेत्तर प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनीवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या दरांचा प्रस्ताव, नगरपालिकेकडून प्राप्त झाल्यावर, **महाराष्ट्र शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिसूचित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, २०१२ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) अधिनियम, १९६२ च्या कलम ४ च्या खंड (अ) मधील उपखंड (२) व कलम ६- ब च्या खंड (अ) मधील उपखंड (२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून जिल्हाधिकारी, पालघर यांना, तलासरी नगरपंचायतीकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याने, जिल्हाधिकारी, पालघर यांच्या कार्यक्षेत्रामधील तलासरी नगरपंचायतीच्या क्षेत्रासाठी निवासी व निवासेत्तर प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा हेतू असलेल्या जमिनीवर व इमारतींवर आकारण्यात येणाऱ्या भांडवलीकृत मूल्यावर आधारित राज्य शिक्षण उपकर व रोजगार हमी उपकर ज्या दराने तलासरी नगरपंचायतीने आकारावयाचे व गोळा करावयाचे आहेत ते दर, याद्वारे सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. ०१ एप्रिल २०२५ पासून अधिसूचित करीत आहे.

अनुसूची - १

महाराष्ट्र शिक्षण व रोजगार हमी उपकर दर

वापरकर्ता प्रवर्ग	शिक्षण उपकर गुणांक	रोजगार हमी उपकर गुणांक
खुला भूखंड	०.०२%(भांडवली मूल्याच्या)	लागू नाही
निवासी (इमारती)	०.०२%(भांडवली मूल्याच्या)	लागू नाही
बिगर निवासी (इमारती)	०.०३ %(भांडवली मूल्याच्या)	०.०१ %(भांडवली मूल्याच्या)

पालघर,
दिनांक १८ ऑगस्ट २०२५.

डॉ. इंदु राणी जाखड़,
जिल्हाधिकारी, पालघर.

BY THE COLLECTOR, PALGHAR

NOTIFICATION

MAHARASHTRA EDUCATION AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) AMENDMENT ACT, 2012.

No. N. Administration/D-11/T-1/WS-551/2025.—Whereas, the Government of Maharashtra has enacted, The Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Amendment Act, 2012 on 20th December 2012 ;

And whereas, sub-clause (*ii*) of Clause (*a*) of Section 4 and sub-clause (*ii*) of Clause (*a*) of Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 (Mah. XXVII of 1962) as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Amendment Act, 2012 empowers the Collector to notify the rates of a Tax on Lands and Buildings used or intended to be used for a Residential and Non-Residential purpose to be levied with effect from 1st day of April 2025 in the Municipal Area of Talasari Nagarpanchayat constituted under the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayat and Industrial Townships Act, 1965 by Notification in *Maharashtra Government Gazette* on receipt of the proposal from Talasari Nagarpanchayat for that purpose.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (*ii*) of clause (*a*) of Section 4 and Sub-clause (*ii*) of Clause (*a*) Section 6-B of the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Act, 1962 as amended by the Maharashtra Education and Employment Guarantee (Cess) Amendment Act, 2012 the Collector, Palghar, district upon receipt of proposal from Talasari Nagarpanchayat hereby notifies the rates of a Tax on Lands and Buildings used of intended to be used for a Residential and Non-Residential purpose at which the State Education Cess and Employment Guarantee Cess on capital value of lands and buildings shall be levied and collected by the Talasari Nagarpanchayat as mentioned in the Schedule appended hereto in the municipal area within the jurisdiction of Collector, Palghar with effect from the 1st day of April 2025.

SCHEDULE – 1

Maharashtra Education and Employment Guarantee Cess Rate

Sr.no.	User category	Education Cess	Employment Guarantee Cess
1	Open Plots	0.02% (of Capital Value)	Not Applicable
2	Residential Buildings	0.02% (of Capital Value)	Not Applicable
3	Non Residential Buildings	0.03% (of Capital Value)	0.01% (of Capital Value)

Palghar
dated 18th August 2025.

DR. INDU RANI JAKHAR,
Collector, Palghar.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.